# प्रमाण पत्र

प्रमाणित करण्यात येते की श्री. शिवाजी मारुती पाटील यांनी " श्रीमती वसुधा पाटील यांच्या कथालेखनाची वैशिष्टये " ('जमुना के तीर' व 'वेगळी' च्या अनुषंगाने ) या प्रबंधिकेचे संशोधन कार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

प्रा. श्री. शिवाजी मारुती पाटील यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या ही प्रबंधिका लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यासाठी माझी अनुमती आहे. सदर प्रबंधिका मराठी लघुकथा अभ्यासक्षेत्रात समाविष्ट होते.

अर्जुननगर
दिनांक: २६-३-१९९८

(प्रा. डॉ. प्रभाकर वि. कुलकर्णी)
मार्गदर्शक

डॉ. प्र. वि. कुलकर्णी
प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख
देवचंद कॉलेज, अर्जुननगर-५९१२६९
जि. कोल्हापूर

# प्रतिज्ञा पत्र

"श्रीमती वसुधा पाटील यांच्या कथालेखनाची वैशिष्टये " ('जमुना के तीर' व 'वेगळी' च्या अनुषंगाने ) या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

' शांती निवास'
अर्जुनवाडी, ता. गडहिंग्लज
दिनांक : २६-३-१९९८

[signature]
अभ्यासक
(प्रा. शि. मा. पाटील)

# अ नु क्र म णि का


| प्रकरण क्रमांक | | विषय | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|
| | | ऋणनिर्देश | |
| | | भूमिका | |
| प्रकरण पहिले | | मराठी कथेची वाटचाल | १ ते २१ |
| प्रकरण दुसरे | | वसुधा पाटील यांच्या कथेची जडणघडण | २२ ते २९ |
| प्रकरण तिसरे | | वसुधा पाटील यांच्या कथा लेखनाची वैशिष्टये ('जमुना के तीर' व 'वेगळी' च्या अनुषंगाने ) | ३० ते ७५ |
| ३.१ | - | सामाजिक कथा | |
| ३.२ | - | कौटुंबिक कथा | |
| ३.३ | - | प्रेमकथा | |
| ३.४ | - | बालकथा | |
| ३.५ | - | इतर स्फुट कथा | |
| प्रकरण चाथे | | व्यक्तिचित्रण | ७६ ते ९५ |
| ४.१ | - | स्त्री व्यक्तिरेखा | |
| ४.२ | - | पुरुष व्यक्तिरेखा | |
| ४.३ | - | भाषाशैली | |
| ४.४ | - | कथांचे वेगळेपण | |
| प्रकरण पाचवे | | उपसंहार | ९६ ते १०२ |
| परिशिष्ट | | 'वसुधा पाटील यांची मुंबई येथे घेतलेली प्रकट मुलाखत' दिनांक ८ डिसेंबर, १९९७ (गोरेगाव निवासस्थानी) | १०३ ते १०५ |
| संदर्भसूची | - | | १०८ ते ११२ |

" ऋणनिर्देश "

मराठीतील लघुकथा हा एक महत्त्वपूर्ण वाङ्मयप्रकार म्हणून गणला गेला आहे. १९६० नंतरच्या स्त्री कथालेखनामध्ये वसुधा पाटील यांनी आपला वेगळा आणि वैशिष्टयपूर्ण ठसा उमटविला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. ( मराठी ) पदवी परीक्षेसाठी " वसुधा पाटील यांच्या कथा-लेखनाची वैशिष्टये " ही प्रबंधिका सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

कथा वाचनाची आवड निर्माण झाल्यानंतर व स्त्रियांची कथा याविषयी ओढ निर्माण झाल्यावर वसुधा पाटलांच्या कथांचे वेगळेपण मला जाणवलं. योगायोगाने एम्. फिल् पदवीसाठी डॉ. पी. व्ही. कुलकर्णी सरांच्या मार्गदर्शनाखाली ' वसुधा पाटील यांच्या कथालेखनाची वैशिष्टये ' हा विषय मी निवडला.

प्रबंधिकेच्या लेखन कार्यासाठी अनेकांचे मला सहकार्य मिळाले. त्यामध्ये वसुधा पाटील यांच्या कथांचा अभ्यास करण्याची दृष्टी आणि दिशा दिली ती डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांनीच. सरांच्या चिकित्सक मार्गदर्शनामुळे माझा विश्वास दुणावला. सरांनी वेळोवेळी केलेली पुस्तकांची मदत स्नेहपूर्ण मार्गदर्शन यामुळेच मी ही प्रबंधिका पूर्ण करू शकलो. असे हे आदरणीय मार्गदर्शक डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांचे हे ऋण शब्दात व्यक्त न करता येण्यासारखेच आहे.

खडतर जीवनाशी सामना देत असताना सुध्दा माझ्या विषयीचे एक वेगळे स्वप्न ज्यांनी उराशी बाळगले, त्यांच्या या तपश्चर्येमुळेच त्यांचे हे स्वप्न या प्रबंधिकेव्दारे मी साकार करु शकलो, ते माझे आई - आबा यांचा मी भक्तिभावाने उल्लेख करतो. त्यांनी मला कायमचे ऋणात ठेवले आहे.

माझी पत्नी वैशाली हिच्याशी स्त्री समस्येवर वेळोवेळी केलेली चर्चा प्रबंधिकेस उपयुक्त ठरली. माझे बंधू श्री. जे. एस. पाटील व बहिणी यांचे स्वप्न मी या प्रबंधिकेतून पूर्ण करू शकलो.

आमच्या सर्वोदय शिक्षण संस्था, कोवाडचे सचिव श्री. एस. व्ही. पाटील व प्राचार्य एस. जे. पाटील त्याचबरोबर प्रा. आर. डी. कांबळे प्रा. आर. जी. पाटील व माझे सर्व प्राध्यापक मित्र या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले सर्व श्री. परशराम पाटील, प्रमोद कांबळे, शंकर पाटील, सुधाकर बाबर, दत्ता पाटील यांचेही सहकार्य लाभले. तसेच श्री. व सौ. चव्हाण टंकलेखक यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. माझे एम. फिल चे वर्गमित्र प्राध्यापक आनंदा संकपाळ व त्यांचे कुटुंबिय यांचे ऋण अविस्मरणीय आहेत. देवचंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. माधव कशाळीकर व करवीर वाचन मंदिर कोल्हापूर आणि या प्रबंधिका लेखनाच्या आणि बांधणीच्या निमित्ताने अनेकांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहाय्य झाले. त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

# भू मि का

आजची मराठी लघुकथा विविध, विपुल, गुणसंपन्न व प्रयोगाभिमुख बनली आहे. गुणवत्तेच्या अनेक पातळ्यावरती फुलत आहे. मराठी कवितेच्या इतिहासात केशवसुत आणि मर्ढेकर या दोन कवींनी क्रांतिकारक बदल केले. त्याप्रमाणे मराठी कथेच्या क्षेत्रात असे महत्त्वाचे बदल प्रथम हरिभाऊ आपटे व त्यानंतर नवकथेने केलेले दिसतात. १९६० नंतरच्या मराठी कथेतून जी संपन्नरूपे दिसतात त्याची पायाभरणी नवकथेने जे बदल केले त्यामुळेच झाल्याचे जाणवते.

मराठी कथेच्या शतकाच्या वाटचालीत स्त्रियांनी केलेले योगदान महत्त्वाचे आहे. स्त्री - कथाकारांनी पुरुषांच्या कथेत न आलेले कांही खास असे स्त्रियांचे अनुभव मांडले आहेत. कांही लेखिका आता स्त्रीवादी दृष्टिकोनातून बोलू .... लिहू लागल्या आहेत. त्यामध्ये कथालेखनाचे रूढ साचे मोडून वसुधा पाटील यांनी आशय आणि अभिव्यक्ती घेऊन लेखन केले आहे. म्हणून त्यांची कथा नव - नवे विचार घेऊन अवतरतांना दिसते.

## पूर्वाभ्यासाचे स्वरूप :

१९६० नंतर उदयास आलेल्या वसुधा पाटील यांच्या कथालेखनावर व एकांकिका लेखनावर कांही प्रमाणात लेखन झालेले आढळून येते. पण ते देखिल त्रोटकच आहे. ' मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन' मध्ये भालचंद्र फडके यांनी, ' मराठी कथा : रूप आणि परिसर मध्ये ' म. द. हातकणंगलेकर यांनी, ' आशय आणि अविष्कार' मध्ये प्रल्हाद वडेर यांनी अगदी थोडक्यात उल्लेख केला आहे. तर ' मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप ' संपादीत गो. मा. पवार या ग्रंथात वि. भा. देशपांडे यांनी त्यांच्या एकांकिका लेखनावर विवेचन केले आहे. वसुधा पाटील या उल्लेखनीय लेखिकेची मराठी

समीक्षेने जेवढी घ्यायला पाहिजे होती तेवढी दखल घेतलेली आढळत नाही. म्हणून वसुधा पाटील त्यांच्या ' जमुना के तीर ' व ' वेगळी ' या दोन पुस्तकांच्या अनुषंगाने ' कथा वैशिष्टयांचा अभ्यास ' या प्रबंधिकेतून करावयाचा आहे.

वसुधा बाईनी कथालेखनाबरोबरच कादंबरी, एकांकिका, नाटयछटा, बालवाङ्मय छोटया मुलांसाठी नाटक इत्यादी विषयावर त्यांनी विपूल लेखन केले असून त्यांच्या तीन कादंबऱ्या व सोळा कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. हे सर्व लक्षात घेता मराठी लघुकथेच्या क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते.

मराठी लघुकथेच्या क्षेत्रात वसुधाबाईंचे हे योगदान अभ्यासनीय वाटल्याने त्यांच्या ' जमुना के तीर ' व ' वेगळी ' या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने त्यांच्या कथा लेखनाचा वाङ्मयीन दृष्टीने शोध आणि बोध घेण्याचा हा प्रयत्न आहे.